भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वाहन चालक हा संवर्ग एकाकी घोषित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः आपना २०१५/प्र.क्र.२५५/पापु १५

७ वा मजला, गोकुलदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००१
तारीख: ३१ मार्च,२०१८

वाचा:

१) **शासन अधिसूचना, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः ग्रा.पा.पु.१०००/प्र.क्र. १०७ (५)/पापु ०७, दि.१४.११.२०००**
२) **शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांकः एपिटी-२०११/प्र.क्र.४२८/आस्थापना-८, दि.१७.०९.२०१२**
३) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः आपना २०१२/प्र.क्र.३७८/पापु १५, दि.१७.०४.२०१३**
४) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, समक्रमांक दि.०१.०१.२०१६**

प्रस्तावना

संदर्भाधिन क्र.४ च्या शासन निर्णयान्वये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वाहन चालकांना वायुसंपीडक चालक या पदाकरीता असलेली पदोन्नतीची तरतूद रद्द करण्यात आली असून यंत्रणेतील वाहन चालक हे पद एकाकी घोषित करण्यात आले आहे. याबाबत संदर्भाधिन क्र.४ च्या शासन निर्णयात "......भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वाहन चालकांना वायुसंपीडक चालक या पदाकरीता असलेली पदोन्नतीची तरतूद याद्वारे रद्द करण्यात येत असून सदर पद एकाकी पद म्हणून याद्वारे घोषित करण्यात येत आहे. " असे नमुद केले आहे. तथापि संदर्भाधिन क्र.१ च्या अधिसूचनेन्वये राज्यशासनाकडील विंधन विहिर व वायुसंपीडक सुरुंग योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आले असल्याने दि.१४.११.२००० पासूनच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वाहन चालकांना पदोन्नतीची संधी राहिलेली नाही. यास्तव भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वाहन चालक हे पद एकाकी घोषित करण्याच्या तारखेत दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन शुध्दीपत्रक

संदर्भाधिन क्र.४ च्या शासन निर्णयामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वाहन चालक हे पद एकाकी घोषित करण्याबाबत ".........भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वाहन चालकांना

वायुसंपीडक चालक या पदाकरीता असलेली पदोन्नतीची तरतूद याद्वारे रद्द करण्यात येत असून सदर पद एकाकी पद म्हणून याद्वारे घोषित करण्यात येत आहे. " असे नमुद केले आहे. त्याऐवजी यापुढे "................भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वाहन चालकांना वायुसंपीडक चालक या पदाकरीता असलेली पदोन्नतीची तरतूद दि.१४.११.२००० पासून रद्द करण्यात येत असून या तारखेपासून भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वाहन चालक हे पद एकाकी घोषित करण्यात येत आहे." असे वाचावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१४३१००२३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Laxman Mohandule

Digitally signed by Ramesh Laxman Mohandule
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=350d84bf5bb049d932c166c9946998dc54a03422ca8777398e5b987ad3e311a6, cn=Ramesh Laxman Mohandule
Date: 2018.03.31 10:22:02 +05'30'

(र.ल.मोहंडुळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
२. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१/२, महाराष्ट्र , मुंबई व नागपूर
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
४. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व)
५. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व)
६. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
७. निवडनस्ती, पापु-१५